महाराष्ट्र शासन, पोलीस विभाग
कळवा पोलीस स्टेशन, ठाणे शहर
रिलांयन्स मार्केट शेजारी, पारसिकनगर, कळवा, दुरध्वनी क्र.०२२–२५३४७२३३
E-mail :– cp.thane.kalwa@mahapolice.gov.in

उत्कृष्ट तपास

आदरणीय सर,

कळवा पोलिस स्टेशन गु.रजि.क्र. I १७८/२०२६ बी.एन.एस कलम १३७(२) प्रमाणे दिनांक ०७/०४/२०२६ रोजी दाखल आहे. सदर गुन्हयाचा तपास मा.वरिष्ठांचे आदेशाने आमचेकडे देण्यात आला होता. सदर गुन्हयातील अपहरीत मुलगा नामे रहेमान उर्फ रोशन इम्रान शेख वय ०३ वर्षे १० महिने यांचा शोध घेणेकामी मा. सपोआ मॅडम श्रीमती प्रिया ढमाळे व वपोनि श्री. अशोक उतेकर, पोलिस निरीक्षक श्री विठ्ठल नावडे यांच्या मार्गदर्शक सुचनाप्रमाणे आम्ही तसेच तपास पथकाचे सर्व अंमलदार यांच्या मदतीने कळवा पुर्व शांतीनगर परीसरातील सि.सी.टि.व्ही. फुटेजची पाहणी केली तसेच कळवा रेल्वे स्टेशन RPF तसेच GRP यांच्याकडे अधिक माहीती घेतली परंतु कोणतीही उपयुक्त माहिती मिळुन आली नाही.सदर मुलाचे ठावठिकाणाबाबत काही एक उपयुक्त माहिती मिळून येत नव्हती.

दिनांक ०९/०४/२०२६ रोजी पोहवा/६९२४ राजपुत, पोना/७१८२ मारेकर यांनी ठाणे रेल्वे स्टेशन येथे रेल्वे GRP पोलिस ठाणेस जाऊन भेटले तसेच गुन्हयातील अपहरीत मुलांचा फोटो तेथील पोलिस अंमलदाराना दाखवुन सदर मुलाबाबत विचारपुस केली.

त्यानंतर ठाणे GRP पोलीस यांनी सदर मुलांचा फोटो हा त्यांच्या रेल्वे ग्रुपवर शेअर केला त्यानंतर कुर्ला रेल्वे पोलिसांचा आम्हाला फोन आला व त्यांनी सांगितले की, त्यांनी नमुद मुलगा हा कुर्ला रेल्वे पोलिस स्टेशनला जमा असल्याचे आम्हास सांगितले.त्यानंतर त्यांनी सदरच्या मुलास CWC मानर्खुद येथे जमा केला असल्याचे सांगितले.

दिनांक ०९/०४/२०२५ नमुद मुलाला घेण्यासाठी कळवा पोलीस ठाण्यातील पोहवा/४९४७ शेळके व मपोशि/आहेर व अपहृत मुलाचे आईवडील असे CWC मानर्खुद येथे जावून त्यांना रिपोर्ट देऊन मुलास त्याच्या आई वडील यांच्या समक्ष ताब्यात घेऊन कळवा पोलिस स्टेशन येथे आणुन त्याच्या आई वडीलांच्या ताब्यात देण्यात आलेला आहे.

मा.सविनय सादर

(हरीश्चंद्र गोसावी)
कळवा पोलिस स्टेशन,
ठाणे शहर.